# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक २४१ वा बुधवार दि.२८ फेब्रुवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.





## आमदार धिरज देशमुख यांचा सवाल; सरकारला दुष्काळाचा विसर; अर्थसंकल्प सर्वसामान्य नागरिक व बळीराजासाठी निराशाजनक

लातूर : महाराष्ट्र सध्या दुष्काळाने होरपळत आहे. पाणी टंचाईचे चटके बसत आहेत. पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. त्यामुळे बळीराजा कमालीचा अस्वस्थ आहे. त्यांना जगायचं कसं, असा प्रश्न पडला आहे. अशा काळात सरकार दुष्काग्रस्तांसाठी विशेष पॅकेज जाहीर करेल, अशी आशा होती. पण, आजच्या अर्थसंकल्पात तसे न झाल्याने दुष्काग्रस्तांच्या पदरी निराशा आली आहे, अशी भावना 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी व्यक्त केली. राज्याचा अंतरिम अर्थसंकल्प आज सादर झाला. या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अर्थसंकल्प सादर झाला. अनेक नव्या घोषणा करण्यात आल्या. पण, मुख्य प्रश्न सर्वांसमोर उभा आहे तो राज्यातील दुष्काळाचा. याचाच सरकारला विसर पडल्याचे दिसून आले, असे सांगत आमदार धिरज देशमुख यांनी दुष्काळाच्या गंभीर स्थितीकडे लक्ष वेधून घेतले. आमदार धिरज देशमुख म्हणाले, वेगवेगळ्या योजनांसाठी निधी जाहीर



करण्यात आला. मग दुष्काग्रस्तांसाठी विशेष पॅकेज का नाही? अर्थसंकल्प सादर करीत असताना 'दुष्काळग्रस्तांना सवलती दिल्या', असे मोघम सांगण्यात आले. हे विधान म्हणजे दुष्काळग्रस्तांच्या जखमेवर मीठ टाकण्यासारखे आहे. कारण प्रत्यक्षात दुष्काळग्रस्तांपर्यंत कसल्याही सवलती अद्याप पोहोचल्या नाहीत, हे वास्तव आहे. सिंचन अनुशेष दूर करण्यासाठी निधी जाहीर केला नाही विदर्भाचा सिंचन अनुशेष दूर करण्यासाठी २ हजार कोटी रुपयांचा निधी जाहीर करण्यात आला. पण, मराठवाड्यातील सिंचन अनुशेष दूर करण्यासाठी एकाही रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली नाही. केवळ प्रगतीपथावर असलेल्या मराठवाड्यातील कामांची नावे सांगण्यात आली. विदर्भाप्रमाणे मराठवाड्यालाही निधी जाहीर केला असता तर इथल्या सिंचनाचे अनेक प्रश्न मार्गी लागले असते, असे आमदार श्री. धिरज देशमुख यांनी सांगितले.

**लेक लाडकी योजना अद्याप कागदावर**

लेक लाडकी योजना ही पूर्वीच्याच अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आली होती. तिचा उल्लेख आज पुन्हा एकदा करण्यात आला. पण, ही योजना वर्ष उलटले तरी अद्याप कागदावरच आहे. तिचा फायदा लाभार्थ्यांना झालाच नाही, असे नुकतेच माध्यमांनी समोर आणले आहे. त्यामुळे सरकारला सर्वसामान्यांची किती काळजी आहे, हे दिसते. म्हणून हा अर्थसंकल्प निराशाजनक असाच आहे, अशी टीका आमदार धिरज देशमुख यांनी केली.

## राज्यातील महायुती सरकारचा अंतरीम अर्थसंकल्प दिशाहीन आणि निराशाजनक

लातूर / प्रतिनिधी : – राज्यातील महायुती सरकारच्या वतीने मांडण्यात आलेला अंतरीम अर्थसंकल्प दिशाहीन आणि राज्यातील जनतेची निराशा करणारा आहे. पायाभूत सुविधा उभारणीला प्राधान्य देऊन हा अर्थसंकल्प जनहितकारी करण्याची संधी या सरकारला साधता आली नाही, अशी प्रतिक्रीया राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री ना. अजित पवार यांनी आज राज्याचा अंतरीम अर्थसंकल्प मांडला आहे. या अर्थसंकल्पावर प्रतिक्रीया देतांना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, या अर्थसंकल्पात महापुरुषांच्या नावाने अनेक घोषणा केल्या आहेत, पण त्यासाठी ठोस तरतूद केली नाही. सरकारने राज्यातील प्रमुख घटक असलेले शेतकरी, शेतमजूर, कामगार यांच्यासाठी काहीच विशेष अशी तरतूद केली नाही. सरकारकडे पायाभुत सुवीधा वाढवून राज्याच्या विकासाची ठोस योजना दिसत नाही, आगामी लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून या अर्थसंकल्पात केवळ घोषणाबाजी स्पष्टपणाने दिसून येत आहे. कृषी, सिंचन, शिक्षण, आरोग्य यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी पुरेशी तरतूद या अर्थसंकल्पात नाही. त्यामुळे हा अर्थसंकल्प निराशजनक आणि दिशाहीन असल्याचे जाणवत आहे आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात अनेक योजना



राबवल्या गेल्या, ज्यामुळे राज्याच्या विकासाला गती मिळाली होती. राज्याचे विकासाची गती पुढे सुरू ठेवण्यासाठी या अर्थसंकल्पात शेतकरी, शिक्षण, आरोग्य आणि इतर महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी पुरेशी तरतूद करणे आवश्यक होते. राज्याचा विकास आणि लोकांचे कल्याण यावर लक्ष केंद्रित करायला हवे होते. पण या प्रमुख बाबीकडेच सरकारने दुर्लक्ष केल्याचे अर्थसंकल्पातून दिसून येत आहे. अर्थसंकल्पापूर्वी मांडलेल्या पुरवणी मागण्या अर्थसंकल्पाचे बरोबरी करणारे आहेत, नव्याने मांडलेल्या या अर्थसंकल्पात कोणत्याच गोष्टीची पूर्तता होणार नाही हे स्पष्ट होत आहे, राज्यावर कर्जाचा बोजा वाढलेला असताना केलेल्या घोषणांची परिपूर्ती कशी होणार हा प्रश्न सर्वांनाच पडला आहे, पावसाळी अधिवेशनाचे दरम्यान जेव्हा पूर्ण अर्थसंकल्प मांडला जाईल त्यावेळेस हे सर्व प्रश्न उपस्थित केले जातील असेही आमदार देशमुख यांनी शेवटी म्हटले आहे.

## गोविंद कुंचमवार यांच्या वाढदिवसानिमित्त नाना नानी पार्क युनिक ग्रुपच्या वतीने गरजू व वंचित लहान मुलांना खेळाचे साहित्य, खाऊ वाटप

### मातोश्री वृद्धाश्रमात केळी व बुंदीचे लाडू वाटप करण्यात आले, तसेच नाना नानी पार्क येथे वाढदिवस साजरा करण्यात आला








लातूर :– नाना नानी पार्क युनिक ग्रुप लातूरच्या वतीने माझं घर या प्रकल्पातील गरजू व वंचित लहान मुलांना बी एस एन एल चे सेवानिवृत्त अधिकारी गोविंद कुंचमवार यांच्या वाढदिवसानिमित्त खेळाचे साहित्य खाऊ व उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले.याप्रसंगी माझं घर प्रकल्पाचे संचालक शरद झरे, कवी डॉ. संजय जमदाडे प्रसिद्ध व्यापारी पुरुषोत्तम मुंदडा, शिरीष माळी,सुभाष आप्पा माशाळकर, रमेशअण्णा मुळे, सुप्रसिद्ध डॉ. श्रीराम कोळेकर, सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय गायकवाड, संजय बागडे, धपाटे सर आदी उपस्थित होते. यावेळी प्रकल्पाच्या संचालक शरद झरे यांनी सामाजिक कार्याचा एकूण प्रवास कथित केला कवी डॉ. संजय जमदाडे यांनी प्रबोधनात्मक कविता सादर करून बोधकथा सांगितली. प्रकल्पातील मुला – मुलींनी विविध गाण्यांचे गायन केले तसेच खेळाचे व कराटेचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

## राहुल गांधी दोन मतदारसंघातून लढणार

नवी दिल्ली : काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत पारंपरिक अमेठी मतदारसंघासह केरळमधील वायनाड येथून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळी अमेठीमध्ये स्मृती इराणी यांनी राहुल गांधी यांना पराभूत केले होते. तर वायनाड येथून राहुल गांधी विजयी झाले होते. मात्र आता राहुल गांधी हे वायनाडचा मतदारसंघही सोडण्याच्या तयारीत असल्याचे वृत्त आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी दोन मतदारसंघातून लढणार आहेत.राहुल गांधी हे कर्नाटक किंवा तेलंगाणामधील एका आणि उत्तर प्रदेशमधील एका मतदारसंघातून निवडणूक लढणार आहेत. केरळमध्ये जागावाटपाबाबत सुरू असलेल्या चर्चेदरम्यान ही माहिती समोर आली आहे. येथे इंडियन यूनियन मुस्लिम लीग (आययूएमएल)कडून काँग्रेसवर २ ऐवजी ३ जागा देण्यासाठी दबाव आणण्यात येत आहे. वायनाडमधील बहुतांश मतदार हे मुस्लिम असल्याने आययूएमएल वायनाड येथून निवडणूक लढवण्यास इच्छूक आहे.त्याबरोबरच भारतीय कम्युनिस्ट पक्ष (सीपीआय)ने पक्षाचे सरचिटणीस डी. राजा यांच्या पत्नी एनी राजा यांना वायनाड येथून निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. अशा परिस्थितीत एका प्रमुख नेत्याची पत्नी राहुल गांधींच्या विरोधात निवडणूक लढवत असेल, तर इंडिया आघाडीसाठी हे चित्र चांगले दिसले नसते. याबाबत डी. राजा म्हणाले होते की, केरळमधील एलडीएफ आघाडीमधून सीपीआयला ज्या चार जागा मिळाल्या त्यापैकी वायनाड एक आहे. वायनाड सोडण्यावर चर्चा नाही पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये वायनाडची सोडण्याबाबत काँग्रेसची समजूत घालण्यासाठी कुठल्याही प्रकारची चर्चा झाली नव्हती, असेही त्यांनी सांगितले. राहुल गांधी यांनी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत या मतदारसंघात सीपीआयच्या पी.पी. सुनीर यांचा ४ लाखांहून अधिक मतांनी पराभव करून लोकसभा गाठली होती.



## बसवराज पाटील, रश्मी बागल यांचा भाजपमध्ये प्रवेश



मुंबई : मराठवाड्यातील नेते बसवराज पाटील आणि सोलापुरातील ठाकरे गटाच्या नेत्या रश्मी बागल यांनी मंगळवार दि. २७ फेब्रुवारी रोजी भारतीय जनता पक्ष(भाजप)मध्ये प्रवेश केला आहे. भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा प्रवेश मुंबईत पार पडला.यावेळी बसवराज पाटील म्हणाले, संपूर्ण देशामध्ये मोदींच्या नेतृत्वात चांगल्या प्रकारचे वातावरण निर्माण झाले आहे. विकसित भारत म्हणून आज मोदींच्या नेतृत्वाच वाटचाल सुरु आहे. आपल्यासाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. देशात त्यांच्यामागे मोठी शक्ती उभे करण्याचे काम आपल्याला करायचे आहे, त्यासाठी हा निर्णय घेतला. राज्यातील प्रत्येक घटकाला कसा न्याय देता येईल, यासाठी फडणवीस नेतृत्व करत आहेत. याच विचाराने मी भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. मी ४० वर्ष काँग्रेसमध्ये होतो. मी अतिशय प्रामाणिकपणे काम केले. आज त्याच निष्ठेने भाजपचे काम करत राहू. माझी कोणाबाबत तक्रार नाही, असे बसवराज पाटील यावेळी बोलताना म्हणाले. येत्या काळात पक्ष प्रवेशाचे बॉम्ब ब्लास्ट दिसतील. मोदींवर लोकांचा विश्वास आहे. येत्या काळात पक्ष प्रवेशाचे बॉम्ब ब्लास्ट दिसतील. महाराष्ट्राचा विश्वास मोदी आणि फडणवीस यांच्यावर आहे, असे चंद्रशेखर बावनकुळे यावेळी बोलताना म्हणाले.

## ॲड.विनोद निला यांना राज्य उत्कृष्ट तालुकाध्यक्ष पुरस्काराने सन्मानीत..

चाकूर, दि.२७ महाराष्ट्र शासन,व्हॉईस ऑफ मीडिया व शेट ब्रिज मोहन लड्डा सेवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय उत्कृष्ट तालुकाध्यक्ष पुरस्कार चाकूर तालुकाध्यक्ष ॲड.विनोद निला यांना यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे मान्यवरांच्या हस्ते देवून गौरविण्यात आले.




महाराष्ट्र शासन,व्हॉईस ऑफ मीडिया व शेट ब्रिज मोहन लड्डा सेवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय विविध पुरस्काराचे वितरण करण्यात आले.यावेळी राज्य उत्कृष्ट तालुकाध्यक्ष पुरस्कार मराठवाड्यातुन व्हॉईस ऑफ मीडियाचे चाकूर तालुकाध्यक्ष ॲड.विनोद निला यांना सोमवार दि.२७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे राज्याचे कौशल्य विकास मंत्री तथा मुंबईचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा,माजी मंत्री तथा युवा सेना प्रमुख आ. आदित्य ठाकरे, आ. रोहित पवार, आ. यशोमती ठाकूर,आ.डॉ. राहुल पाटील,आयुष्यमान भारतचे महाराष्ट्राचे प्रमुख ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते व व्हॉईस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के, कार्यालयीन सचिव दिव्या भोसले, मराठवाडा अध्यक्ष विजय चोरडीया आदिच्या उपस्थितीत देऊन सन्मानीत करण्यात आले. यावेळी तालुका सरचिटणीस संग्राम वाघमारे,जिल्हा कार्यवाहक सुधाकर हेमनर, सदस्य सदाशिव मोरे, संजय पाटील, सतीश घुमाडे, निवृत्ती सोमवंशी, गणेश सूर्यवंशी आदि उपस्थित होते. व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने तालुक्यात पत्रकारांसाठी वैयक्तिक विमा, पत्रकार पाल्यांना खाजगी शिकवणी फीस मध्ये सवलत असे विविध उपक्रम व रक्तदान शिबीर आदि सामाजिक उपक्रम राबविण्यात आले आहेत.याची दखल घेवुन सदरचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.त्यामुळे निला यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

संपादकीय....

## मराठी भाषेसमोरील 'ही' आहेत आव्हाने!

डॉ. अरुण शिंदे जी भाषा, ती बोलणार्या समाजास रोजगार देऊ शकत नाही, ती भाषा तो समाज सोडून देण्याचा प्रयत्न करतो, असे अमेरिकन गणिती तज्ज्ञ डॅनिअल एब्राम यांनी म्हटले आहे. मराठी राज भाषा गौरव दिनानिमित्ताने मराठीच्या सद्य:स्थितीची व मराठीपुढील आव्हानांची चर्चा चिकित्सा करणे आवश्यक आहे. मराठीपुढील सर्वात मोठे आव्हान शिक्षणाच्या क्षेत्रात आहे. मराठी माध्यमातून आणि मराठी भाषा विषय घेऊन शिकणार्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. अकरावी कला शाखेला मंजूर विद्यार्थी संख्येच्या निम्म्याही जागा भरल्या जात नाहीत. महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची जमवाजमव करताना शिक्षकांच्या नाकी नऊ येत आहेत. विद्यार्थ्यांना संपर्क करून, त्यांना प्रलोभने दाखवून कशी तरी किमान विद्यार्थी संख्या गाठण्यासाठी शिक्षक धडपडताना आढळून येतात. वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये मराठी विषयातून बी.ए., एम.ए. करणार्या विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आहे. पुरेसे विद्यार्थी कागदोपत्री दाखवून विषय टिकवून ठेवण्यात शिक्षक धन्यता मानतात. पदवी व पदव्युत्तर मराठी विभागाच्या वर्गात हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी विद्यार्थ्यांची उपस्थिती असते. बहुसंख्य विद्यार्थ्यांना मराठी भाषा, साहित्य व एकूण शिक्षणाची आस्था नसते. केवळ परीक्षा देणे आणि पदवी मिळवणे एवढाच त्यांचा उद्देश असतो. पदवीधर होऊनही त्यांना मुद्देसूदपणे विचार व्यक्त करता येत नाहीत.याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे मराठी विषय घेऊन पदवी मिळवल्यानंतर पुढे त्याला स्वत:च्या भवितव्याची कोणतीही संधी दिसत नाही. मराठीतून शिक्षण घेतल्यावर रोजगार मिळवण्याची कुठलीही शाश्वती नाही. त्यामुळे जोपर्यंत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारी भाषा म्हणून मराठी पुढे येत नाही, तोपर्यंत मराठीतून शिक्षण घेण्यास विद्यार्थी तयार होणार नाहीत आणि जी भाषा शिक्षणातून बाजूला जाते, ती भाषा हळूहळू लोकव्यवहारातूनही बाजूला जाऊ शकते आणि हाच मराठीपुढे मोठा धोका आहे. याचा राज्यकर्त्यांनी आणि मराठी समाजाने गंभीर विचार केला पाहिजे.इंग्रजीचे मराठीवरील आक्रमण हा चिंतेचा विषय आहे. मध्यमवर्गीय नागरिक, उच्चभ्रू वर्ग यापूर्वीच इंग्रजीधार्जिणा होऊन नव्या संधी, रोजगार, पदे यांचे लाभ भोगत होता. आता निमशहरी, ग्रामीण भागातील जनसमूहही इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे आकर्षित होत आहे. मराठी माध्यमातून शिकून काय उपयोग, हा प्रश्न टोकदारपणे, सार्वजनिकरीत्या विचारला जात आहे. याचे समाधानकारक उत्तर राज्यकर्ते व धोरणकर्त्यांकडे नाही. सध्या सेमी इंग्रजीच्या नावाखाली पहिलीपासून गणित व विज्ञान विषयांचे शिक्षण इंग्रजीमधून दिले जाऊ लागले आहे. मानव्यविद्या, सामाजिकशास्त्रे, वाणिज्य या क्षेत्रांतही मराठी माध्यम कालबाह्य ठरत असून, पालकांचा, विद्यार्थ्यांचा इंग्रजी माध्यमाकडे कल वाढला आहे. मातृभाषेपासून मुलांना दूर नेणे म्हणजे त्यांची सामाजिक पाळेमुळे खणून काढणे आहे. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान ज्या भाषेतून प्रकटते, ती भाषा जगावर अधिराज्य गाजविणार. म्हणून विज्ञान तंत्रज्ञानातील नवनव्या संकल्पना, शोध, नवनिर्मित वस्तूंशी निगडित शब्दांना सामावून घेण्यासाठी मराठीचा शास्त्रीय पारिभाषिक परीघ तातडीने विस्तारला पाहिजे. आधुनिक विज्ञान आपल्या भाषेत येत राहिले की, वैज्ञानिक प्रश्नांचा आपल्या भाषेत विचार करण्याची सवय लोकांना लागेल. विज्ञाननिष्ठ समाजनिर्मितीची ही पहिली पायरी असेल. विज्ञानासाठी मराठी बलिष्ठ होणे सर्वात गरजेचे आहे. विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकांमधील वैज्ञानिक परिभाषा व विज्ञानविषयक लेखन विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिक यांना समजेल, त्यांच्यात विज्ञानविषयक आस्था व अभिरुची निर्माण होईल अशा सोप्या भाषेत केले पाहिजे.महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार पुस्तके तयार करण्याच्या हेतूने विद्यापीठ पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ अस्तित्वात आले. सामाजिक शास्त्रांची पदवी पातळीवरची अनेक चांगली पुस्तके या मंडळाने प्रसिद्ध केली; परंतु पुढे शासनाने हे मंडळ बंद केले. मराठीत विविध ज्ञानशाखांतील विषयांची ग्रंथसंपदा, दर्जेदार पाठ्यपुस्तके, संदर्भग्रंथ नाहीत. ज्ञानकोश, परिभाषाकोश आणि शब्दकोश हे पुरेशा प्रमाणात निर्माण करू शकलो नाही. मराठीच्या शब्दसंग्रहात लक्षणीय स्वरूपाची भरही टाकता आलेली नाही. नव्या ज्ञानशाखा, नवी संज्ञापन तंत्रे यावर हुकूमत प्राप्त करण्यासाठी मातृभाषेत ज्ञानाची निर्मिती करत ती जगाच्या प्रांगणात धाडली पाहिजे. कृषी संस्कृतीतील पारंपरिक कारागिरी, अवजारे, हत्यारे, भांडी, दागिने, पदार्थ, वाद्ये, कपडे, वनस्पती, औषधे, लोकखेळ यांसारख्या अनेक जुन्या गोष्टी कालबाह्य होत आहेत. यामुळे बोलीभाषेतील शेकडो शब्द, ज्ञानपरंपरा व एक संस्कृतीच नामशेष होत आहे. एकंदरीत वर्तमान मराठी बोली आपल्या अमूल्य भाषिक, सांस्कृतिक संचितासह हरवत चालल्या आहेत, तर काही नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. गेल्या साठ वर्षांत मराठीचा विकास करण्याचे प्रयत्न गांभीर्याने झालेले नाहीत. एखादी भाषा केवळ शिक्षणाचे माध्यम बनल्याने ज्ञानभाषा होत नसते. जेव्हा त्या भाषेत ज्ञाननिर्मिती होते, ज्ञान प्रसवू लागते, तेव्हा ती ज्ञानभाषा होते. मराठी ज्ञानभाषा होण्यासाठी ज्या मराठीत बालपणापासून आपल्या संकल्पनांची घडण होते, त्याच मराठीत शिक्षण झाले पाहिजे आणि त्याच मराठीत आपले सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, राजकीय, शैक्षणिक, दैनंदिन व्यवहार झाले पाहिजेत, तरच जीवनाच्या सर्व क्षेत्रांत व व्यवहारात आपल्याला ज्ञानाचे नीट उपयोजन करता येईल. कला, विद्या, ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान या क्षेत्रात मूलभूत निर्मिती करता येईल. मराठी भाषेच्या अस्मितेच्या आणि प्रतीकांच्या, उत्सवीकरणाच्या राजकारणापलीकडे जाऊन मराठीला ज्ञानभाषा, रोजगारभाषा, व्यापार उदिमाची भाषा बनवण्यासाठी प्रत्येकाने झटले पाहिजे. त्यासाठी मुळात आपल्या भाषेवर पुरेसे प्रेम असले पाहिजे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मराठा समाजाला आरक्षण देऊ केले होते.पण?.

गेल्या काही महिन्यापासून मराठा आरक्षणाच्या मुद्दयावर रस्ता रोको,मोर्चे, आमरण उपोषणाच्या मार्गाने सातत्याने आंदोलन सुरू आहे. जसजशी आंदोलनाची तीव्रता वाढत गेल्याचे दिसल्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सतत सांगत होते की,मी मराठा आरक्षणाच्या बाजूने आहे,परंतु ते आरक्षण कायद्याच्या कसोटीवर टिकले पाहिजे यासाठी कायदेशीर बाबी तपासून घेण्यासाठी मला वेळ द्या.त्याप्रमाणे महाराष्ट्राच्या दोन्ही सभागृहात शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये १०% आरक्षण मंजूर केले. मराठा समाजातील गरीब मुलांना ह्याचा निश्चित फायदा होईल.म्हणुन सर्वांना आनंद झाल्यामुळे महाराष्ट्रातील तमाम जनतेने हजारो रुपयांचे फटाके फोडून आनंद साजरा केला.एकमेकांचे मिठाईने तोंड गोड केले.मराठा समाजाच्या आरक्षणाला महाराष्ट्रातील जनतेने कायम पाठींबा दिला आहे. ह्या पार्श्वभूमीवर सहाजिकच मनात प्रश्न उपस्थित होतो की,नवीन मुंबईतून आंदोलन समाप्त करीत ते समाधानाने परत का गेले? सरकारने त्यांची फसवणूक केली का? त्यामुळे त्यांना पुन्हा आंदोलन सुरू करावे लागले का ? ह्या परिस्थितीचा फायदा घेत सरकार आणि विरोधी पक्ष एकमेकांवर आरोप,प्रत्यारोप करीत आहेत.कोण बरोबर आहे किंवा कोण चूक आहे. ह्या वादात न पडता आंदोलनाची सुरुवातीपासूनची उजळणी होणे मला गरजेचे वाटते.

माथाडी कामगार नेते अण्णासाहेब पाटील ह्यांनी १९८० साली पहिल्यांदा मराठा आरक्षणाची मागणी केली.त्यासाठी मुंबईत पहिला मोर्चा २२/०३/१९८२ रोजी काढण्यात आला.त्यावेळी बाबासाहेब भोसले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांनी मागणी मान्य केली.परंतु त्याच्या दुसर्या दिवशी अण्णासाहेब पाटील ह्यानी आत्महत्या केल्यामुळे पुढील काळात ती मागणी पूर्ण करण्यासाठी कुणी पुढाकार घेतला नसल्यामुळे त्यात प्रगती झाली नाही.विशेष बाब म्हणजे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर १९७८ पासून शरद पवार,बाबासाहेब भोसले,वसंतदादा पाटील,शिवाजीराव निलंगेकर पाटील, शंकरराव चव्हाण,नारायण राणे,विलासराव देशमुख,अशोक चव्हाण,पृथ्वीराज चव्हाण हे मराठा नेते होते.आणि त्याच्या मंत्रीमंडळात बहुसंख्य मराठा समाजाचे मंत्री होते तरी देखील हे आरक्षण आतापर्यंत का मिळाले नाही? ह्याचाही विचार होणे अगत्याचे असल्याचे वाटते.त्यांना मराठा समाजाची असूया असण्याचा प्रश्ण येत नाही.मग त्यांनी आरक्षण का दिले नाही? त्यातील काही मुख्यमंत्री तर कायद्याचे पदवीधर होते. मग त्यांना आरक्षण का देता आले नाही?

१९९५ ला स्थापन झालेल्या राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती खत्री ह्यांच्या नेतृत्वाखाली नेमलेल्या आयोगाने अहवाल सादर केला. त्यात ज्यांची नोंद मराठा कुणबी किंवा कुणबी मराठा आहे अशा लोकांना कुणबी दाखला देण्यात येऊन, त्यांना इतर मागासवर्गीय जातीच्या अंतर्गत समाविष्ट करण्याची शिफारस केली.त्यानंतरच्या २००४ साली नेमलेल्या बापट आयोगाने अहवाल सादर करीत बहुमताने मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी फेटाळून लावली.नंतरच्या काळात मराठा सेवा संघाने ही मागणी लावून धरीत सातत्याने आंदोलन केले. त्याला छत्रपती संभाजी राजे भोसले व उदयन राजे भोसले ह्यांनी समर्थन देत मराठा समाजाला २५% स्वतंत्र आरक्षण मागितले. ते आंदोलन सुरू असतांना नारायण राणे ह्यांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन करण्यात आली.पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असतांना,त्यांनी मराठा समाजाला १६% व मुस्लिम समाजाला ४% आरक्षण दिले.त्याला आव्हान देत केतन तिरोडकर ह्यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. मुंबई उच्च न्यायालयाने त्यावर १४/१०/२०१४ ला निकाल देत हे आरक्षण रद्द केले.नंतर देवेंद्र फडणवीस हे युती सरकारचे मुख्यमंत्री असताना त्यांनी गायकवाड आयोग नेमला.त्यांच्या शिफारशीनुसार १५/११/२०१८ रोजी मराठा समाजाला १३% आरक्षण मान्य केले. ह्यातील मेख अशी आहे की, त्याच्या तीन महिने अगोदर १४/०८/२०१८ रोजी केंद्र सरकारने १०२ वी घटनादुरुस्ती करीत राज्य सरकारचे आरक्षण देण्याचे अधिकार रद्द करून, राज्य सरकारला फक्त विशेष आवश्यक परिस्थितीनुसार आरक्षण देण्याचे हक्क ठेवले.



त्यानुसार फडणवीस सरकारने मराठा आरक्षण मंजूर करतांना कोणती विशेष आवश्यक परिस्थिती विषद केली ह्याचा खुलासा होणे अपरिहार्य आहे.

दरम्यानच्या काळात राज्य सरकारने मान्य केलेल्या आरक्षणा विरुद्ध जयश्री पाटील ह्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या ५ न्यायमूर्तींच्या खंडपीठा समोर गुणवंत सदावर्ते ह्यांनी संदर्भित कायदेशीर बाजू मांडीत आरक्षणाला विरोध केला. त्याचा ०५/०५/२०२१ रोजी निकाल देत महाराष्ट्र सरकारचा निर्णय रद्द करीत,मराठा आरक्षण असंवैधानिक असल्याची नोंद केली.ह्या पार्श्वभूमीवर पुन्हा गेल्या काही महिन्यांपासून मनोज जरांगे पाटील ह्यांच्या नेतृत्वाखाली मराठा आरक्षण आंदोलन पेटले असून आमरण उपोषण,मोर्चे ह्यांनी महाराष्ट्राचे सामाजिक वातावरण ढवळून निघाले आहे. दरम्यानच्या काळात मराठा समाजातील कुणबी नोंद असलेल्या सर्वांना,सग्या सोयर्या सह सरसकट दाखले देण्याची मागणी पुढे आली. त्यावरून ओ.बी.सि.समाजात संतापाची लाट पसरली.त्यांनी देखील ह्या विरोधात भूमिका घेतल्यामुळे वातावरण तापले. तो कलगीतुरा सुरु असतांना एकनाथ शिंदे सरकारने पुन्हा एकदा १०% मराठा आरक्षण मंजूर केले आहे. परंतु ह्यावर जरांगे पाटील समाधानी नसून त्यांनी आंदोलन सुरूच ठेवले आहे.

ही झाली आतापर्यंतची मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी झालेली वाटचाल. एकूणच परिस्थितीचा विचार केल्यास असे दिसते की,जरांगे पाटील ह्यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता,ह्या मागणीसाठी सातत्यपूर्ण आंदोलन करीत सरकारला निर्णय घेण्याच्या प्रक्रियेपर्यंत आणण्यास भाग पाडले.ह्यात दुमत असण्याचा प्रश्नच नसून,ह्याचे श्रेय सर्वस्वी त्यांनाच जाते.त्या आंदोलनाच्या रेट्यामुळे महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाला १० % आरक्षण देण्याचा निर्णय घेऊन तो दोन्ही सभागृहांत बहुमताने मंजूर केला.हे जरी खरे असले तरी,मराठा आरक्षणाला मागच्या दोन वेळा महाराष्ट्र सरकारने दिलेली मंजुरी मुंबई उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाच्या ५ न्यायमूर्तींच्या खंडपीठाने फेटाळून लावली आहे. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारला पुन्हा तीच मागणी मंजूर करण्याचा अधिकार आहे काय? असा प्रश्न उभा राहतो. तसेच हे आरक्षण केंद्र सरकारने १०२ व्या घटना दुरुस्तीने घालुन दिलेल्या कक्षेत बसते का? ह्याचाही विचार होणे आवश्यक आहे. किंवा त्याचा हे विधेयक मंजूर करतांना विचार केला गेला आहे का? सरकार आणि जरांगे पाटील ह्यांच्याकडे वकिलांची फौज असल्यामुळे ह्या कायदेशीर बाबींचा निश्चित विचार केला असणार.सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने मराठा आरक्षण असंवैधानिक ठरवून ते रद्द केल्याच्या पार्श्वभूमीवर,जर कुणी त्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले तर राज्य सरकारने सध्या मंजूर केलेले आरक्षण टिकेल का? किंवा जर त्याला कुणी पुन्हा आव्हान दिले तर न्यायालयीन प्रक्रियेत हे विधेयक टिकेल यासाठी राज्य सरकारने यावेळी काय काळजी घेतली आहे? ह्याची स्पष्टता होणे आवश्यक आहे. जेणेकरून ह्या संबंधी पुन्हा आंदोलन करण्याची वेळ येऊ नये.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे किती दूरदर्शी ह्याचा उल्लेख याठिकाणी करणे आवश्यक आहे.ज्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर घटना समितीचा मसुदा तयार करीत होते,तेव्हा त्यांनी मराठा समाजाला आरक्षणाच्या कक्षेत आणण्याचे ठरविले होते.परंतु ती गोष्ट मराठा समाजाला समजल्यामुळे, त्यांनी बाबांच्या घरावर मोर्चा काढून,आम्ही काय मागासवर्गीय आहोत काय? असा सवाल करीत,त्या विरोधात मोर्चा काढला.त्यावेळी असे घडले नसते तर ही वेळ आलीच नसती.बाबा,तुम्ही फक्त महाज्ञानी नव्हता तर भविष्यातील प्रश्न,त्या काळात तुम्हाला लख्खपणे दिसत होते. इतके तुम्ही दृष्टे होता हेच यावरून सिद्ध होते.

*********


जयभीम.

अरुण निकम,
९३२३२४९४८७,मुंबई.

# मूलनिवासी बहुजन चळवळीत दीनाभाना यांचे योगदान.

मूलनिवासी बहुजन चळवळीला नवीन दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य दीनाभाना यांनी केले आहे. आज त्यांच्या जयंती निमित्त त्यांना समजून घेण्यासाठी थोडासा प्रयत्न करुया. राजस्थानमधील जयपूर पासून ४० किलोमीटर अंतरावर असलेल्या वागास या गावी २८ फेब्रुवारी १९२८ ला दीनाभाना यांचा जन्म झाला. सुरूवातीला त्यांच्या परिवाराकडून त्यांचे दीनानाथ असे नाव विचारपूर्वक ठेवण्यात आले होते. पुढे त्यांनी दीनानाथ मधून नाथ कमी करून वडिलांचे नाव भाना जोडून दीनाभाना असे केले. पुढे ते दीनाभाना या नावाने ओळखले जाऊ लागले. ते आपल्या आईवडिलांचे पाचवे अपत्य होते. त्यांना पाच भाऊ आणि एक बहीण होती. ते १४ ते १५ वर्षाचे असताना त्यांच्या जीवनात एक घटना घडली. ती अशी की, दीनाभाना यांच्या वडिलांनी गांवातील एका जाट व्यक्तीला त्यांच्या पाळीव प्राण्यांना चारा पाण्यासाठी हौद बनवून दिला होता. ज्याच्या मजुरीच्या बदल्यात त्यांनी म्हैस भेट दिली होती. त्यामुळे दीनाभाना यांना फार आनंद झाला कारण त्या काळात त्यांच्या समाजातील व्यक्तींना धार्मिक बंधनाप्रमाणे म्हैस पाळण्यावर बंदी घातली होती. गावातील पहाडीवर त्या गांवचे राजा ठाकूर यांचा राजवाडा होता. तिथून भाना यांच्या घरी बांधलेली म्हैस स्पष्ट दिसत होती. याची चौकशी केल्याने राजाला लक्षात आल्यावर भाना यांना बोलावून घेतले. तेव्हा राजाने भाना यांना म्हैस या विषयावर विचारणा केली तेव्हा त्यांनी जाटाकडून विकत घेतल्याचे स्पष्ट केले. तेव्हा राजाने ती म्हैस परत करायला सांगितलं. डुक्कर पाळणारे म्हैस कशी पाळू शकतात? याची त्यांना जाणीव करून दिली. परिणामी भीतीपोटी भाना यांनी ती म्हैस जाट या व्यक्तीला परत केली. यावरून जातीची भयानकता दीनाभाना यांच्या लक्षात आली आणि ते वागास गाव सोडून १९३७ ला दिल्ली येथे आपल्या भावाकडे आले. पुढे १९४६ ला ते पुणे येथे आले जिथे त्यांना थोड्याच दिवसात सरकारी कर्मचारी म्हणून नोकरी मिळाली. ज्यात त्यांनी आपल्या भंगी जातीचा उल्लेख केला होता. त्यामुळे त्यांची नियुक्ती कामगार म्हणून करण्यात आली होती तरी त्यांच्या कडून साफसफाई चे काम करवून घेतले जात असे. यात ते समाधानी नव्हते. पण त्यांच्यासमोर पर्याय उपलब्ध नव्हता म्हणून ते सहन करीत होते. त्यांनी १९४४ मध्ये दिल्लीस्थित पंचकुइयाँ परिसरात झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सभेला उपस्थित असताना ऐकले होते, त्यात बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, आपण जास्तीत जास्त शिक्षण घेतले पाहिजे. त्यामुळे त्यांनी थोडेफार इंग्रजी शिक्षण घेतल्याने त्यांना १९६७ ला डिफेन्स मध्ये निरीक्षक पदावर पदोन्नती मिळाली.

मूलनिवासी बहुजन समाजातील चळवळीला एक नवे वळण मिळाले ते असे की, पुणे स्थित आर्डीनंन्स फॅक्टरी मध्ये १९५७ पासून बुद्ध जयंती व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त कर्मचाऱ्यांना सार्वजनिक सुट्टी दिली जात होती. परंतु १९७०-७२ च्या काळात प्रशासनातर्फे या दोन्ही सुट्ट्या रद्द करून एक टिळक जयंती व दुसरी दिवाळी च्या सुट्टीत बदल करण्यात आली. त्या काळात आर्डीनंन्स फॅक्टरी मध्ये २२००० हजार कर्मचारी होते. त्यात ४२ महार व ६ भंगी असे ४८ जण चतुर्थ श्रेणी कर्मचारी होते. या सर्व कर्मचाऱ्यांच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या समस्या निर्मूलनासाठी १०० सदस्यांची एक समिती तैयार करण्यात आली होती. त्याच काळात मान्यवर कांशीराम जी त्या कार्यालयात अधिकारी पदावर कार्यरत होते. तेव्हा कांशीराम जी यांनी दीनाभाना जी यांच्यात हिंदी, इंग्रजी सुधारणा घडवून आणली आणि त्यांच्या कडे प्रयोगशाळेची देखभाल करण्याचे काम सोपविण्यात आले. त्यामुळे चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांचे नेतृत्व करण्याची संधी त्यांच्या कडे चालून आली होती. परिणामी त्यांना त्या १०० सदस्यीय समितीत चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली होती. त्या संधीचे सोने करण्याची संधी चालून आली होती म्हणून त्यांनी बुद्ध व आंबेडकर जयंती च्या सुट्ट्या रद्द करण्याच्या निर्णयाविरोधात समितीसमोर प्रश्न उपस्थित केला त्यामुळे प्रशासन अडचणीत आले होते. तेव्हा प्रशासनाने चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना प्रश्न विचारला की, काय आपण दीनाभाना यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या मागणीशी सहमत आहात? तेव्हा कर्मचा-यांनी सहमत नसल्याचे सांगितले आणि त्यांना नोकरीची आवश्यकता असल्याचे लेखी पत्र लिहून दिले होते. त्यामुळे प्रशासनाने दीनाभाना यांना कमिटीतून काढून टाकले जात असल्याची नोटीस दिली. तसेच एक आठवड्यात नोकरीतून सुद्धा काढून टाकण्यात येईल असेही स्पष्ट करण्यात आले होते. परिणामी कार्यकारी कमिटीच्या सदस्य पदाची निवडणूक रद्द करण्याची नोटीस पण देण्यात आली. हे प्रकरण मान्यवर कांशीराम जी यांनी त्यांच्या वकील मित्राला सांगितली तेव्हा त्यांनी कुठल्याही मतदारांना निवडून दिलेल्या प्रतिनिधींना माघारी बोलविण्याची तरतूद कायद्यात नसल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे वकिलांमार्फत दीनाभाना यांनी कमिटीचे चेअरमन, प्रशासन व इतर अधिका-यांना नोटीसा पाठविल्या परिणामी पुनश्च होणारी निवडणूक स्थगित करण्यात आली. त्यामुळे ज्या चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांनी दीनाभाना यांच्या सोबत नसल्याचे पत्र प्रशासनाला दिले होते ते मात्र कांशीराम यांना येऊन भेटले परंतु त्यांनी दीनाभाना यांच्या समर्थनार्थ उभे राहिले नाहीत. त्या काळात दीनाभाना यांना बडतर्फ केल्याने उत्पन्नाचे स्त्रोत बंद झाल्याने कुटुंब अडचणीत आले. तेव्हा कांशीराम यांनी दीनाभाना यांना त्यांच्या पगाराएवढी रक्कम देण्याचे अभिवचन दिले होते. म्हणून ब्राह्मणवादी प्रशासनाने दीनाभाना यांच्या पत्नीला माफी मागण्यासाठी तैयार करावे असा दबाव टाकण्याचा प्रयत्न केला होता, त्याला



त्या बळी पडल्या नाहीत.

या अनुषंगाने बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या सुट्ट्या रद्द करून दीनाभाना यांना बडतर्फ करण्याच्या उद्देशाने कोर्टात फिर्याद दाखल करण्यात आली होती. त्या काळात या केसच्या संदर्भात डी. के. खापर्डे साहेब यांची कांशीराम सोबत भेट झाली. तेव्हा बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा झाली. त्याप्रसंगी डी. के. खापर्डे यांनी मान्यवर कांशीराम यांना जातीचे निर्मूलन ( -पपळहळश्ररींळेप`ष उरींेश) ही पुस्तक भेट दिली. जी त्यांनी सात वेळा वाचली. त्यामुळे मूलनिवासी बहुजन समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचे कारण कळले. म्हणून या व्यवस्थेच्या विरुद्ध लढ्यात सहभागी व्हायचे त्यांनी ठरविले. त्यांच्या हे पण लक्षात आले की, 'इच्छा प्रबळ असेल तर मार्ग काढले जाऊ शकतात आणि इच्छा प्रबळ नसेल तर बहानेबाजी पुढे येईल.' याच काळात दीनाभाना यांना कांशीराम मदत करीत असल्याची प्रशासनाला पूर्ण जाणीव झाल्याने संचालकांनी कांशीराम यांना दालनात बोलावून घेतले आणि बाबासाहेब बदमाश असल्याची माहिती कांशीराम यांना दिली. कारण बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माचे फार नुकसान केल्याचे संचालकांनी स्पष्ट केले होते. तेव्हा कांशीराम यांनी प्रशासनाला पूर्ण विरोध केला होता. एवढेच नव्हे तर १४ एप्रिल च्या सुट्टी जाहीर करण्यास भाग पाडले होते. मात्र प्रशासनाने चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना कामाच्या मोबदल्यात ओव्हरटाईम देण्याचे जाहीर केले. ज्यात चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांनी काम केले. पुढे मात्र या दोन्ही केसचा निकाल दीनाभाना यांच्या बाजूने लागला. त्यामुळे संचालकांची बदली करण्यात आली तर उपसंचालकांना नोकरीतून काढून टाकण्यात आले होते. तर दीनाभाना यांना नोकरीचे सर्व लाभ प्रदान करण्यात आले. रद्द केलेल्या दोन्ही सुट्ट्या पूर्ववत सुरू करण्यात आल्या. याचा आनंदोत्सव साजरा करताना पुण्यात खुशीची लहर निर्माण झाली. ज्याला त्या काळात दादासाहेब गायकवाड यांनी सुद्धा सहकार्य केले होते. त्यामुळे मूलनिवासी बहुजन समाजावर होणा-या अन्याय अत्याचाराला थांबविण्यासाठी कर्मचाऱ्यांनी आपली भूमिका पार पाडली पाहिजे अशी संकल्पना पुढे आली. त्यामुळे १९७३ ते १९७८ या पाच वर्षांच्या काळात मूलनिवासी बहुजन समाजात आपल्या आदर्श महापुरुषांच्या विचारधारेचा प्रचार प्रसार करण्यात आला. परिणामी ६ डिसेंबर १९७८ ला दिल्ली च्या बोट क्लब वर बामसेफ च्या पहिल्या अधिवेशनात बामसेफ ची निर्मितीच्या अनुषंगाने सामाजिक भूमिका स्पष्ट करण्यात आली. अशाप्रकारे दीनाभाना यांनी आर्डीनन्स फॅक्टरी च्या समन्वय समितीच्या बैठकीत सदरील मुद्यावर एल्गार पुकारल्यामुळे पुढे जाऊन बामसेफची स्थापना करण्यात आली. एवढे महत्त्वपूर्ण योगदान मान्यवर दीनाभाना यांचे मूलनिवासी बहुजन चळवळीत आहे. याची आपण दखल घेऊन मार्गक्रमण करावे. हीच त्यांना जयंती निमित्त आदरांजली ठरेल असे मला वाटते. या शाब्दिक मार्गदर्शनाने मी त्यांना आदरांजली अर्पण करतो. तसेच जयंती निमित्त आपणांस कोटी कोटी सदिच्छा.

*******************

लेखक : मेश्राम बी. बी., अभ्यासक, संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, छत्रपती संभाजी नगर, (औरंगाबाद) महाराष्ट्र. ४३१००२.
संपर्क : ९४२१६७८६२८.
ींवललासारळश्र.लो.

# इंडियन मेडिकल असोसिएशनच्या आयएमएथॉन स्पर्धेत १ हजार ४९५ स्पर्धक सहभागी होणार : डॉ. अनिल राठी





लातूर : इंडियन मेडिकल असोसिएशन लातूर तर्फे आयोजित आयएमएथॉन लातूर २०२४ ही मॅरेथॉन स्पर्धा रविवार, दि. ३ मार्च २०२४ रोजी होणार असून ह्या स्पर्धेची जय्यत तयारी पूर्ण झाल्याची माहिती संयोजकांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली. या स्पर्धेत एकूण १ हजार ४९५ स्पर्धक सहभागी होणार असल्याचे आयएमएचे अध्यक्ष डॉ. अनिल राठी यांनी सांगितले. आयएमएच्या ही आयोजित करण्यात येत असलेली ही चौथी आवृत्ती असून दरवर्षी आयएमएथॉनला स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असतो. या मॅरेथॉनसाठी १४९५ धावपटूंनी आपली नावे नोंदवली आहेत. या सर्वांना धावताना बघणे व प्रोत्साहित करणे हा लातूरकरांसाठी खूप अविश्वसनीय अनुभव राहणार आहे. आयएमए लातूरच्या वतीने ह्या मॅरेथॉनची थीम एार्ुशी क्शी, एश्रर्शीरिंश –श्रश्र, ठीप षी एर्रिश्ऴीं ऴप र्शीशी डींश अिर्थात तिला सक्षम करा, सर्वांना उन्नत करा, प्रत्येक टप्प्यावर समानतेसाठी धावा अशी ठेवण्यात आलेली आहे. आठ मार्च रोजी होणाऱ्या जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर स्त्री शक्तीचे सक्षमीकरण आणि समानता अशी थीम आयोजकांनी विचारपूर्वक निवडलेली आहे. त्याबद्दल आयोजकांचे सहभागी स्पर्धक, डॉक्टर्स, शासकीय अधिकारी व राजकीय नेतेमंडळी ह्या सर्व स्तरातून कौतुक होत आहे. मॅरेथॉन स्पर्धेच्या धावपटूंमध्ये महिलांचे प्रमाण देखील लक्षणीय असणार आहे. यावेळी बोलताना डॉ. अनिल राठी यांनी सांगितले की, २१ किमी स्पर्धेत एकूण १७१ स्पर्धक सहभागी होत असून त्यात महिलांची संख्या २४ तर पुरुषांची संख्या १४७ आहे. १० किमी स्पर्धेत एकूण ५१३ स्पर्धक सहभाग नोंदवत असून त्यात महिला ७५ आणि पुरुष ४३८ आहेत. ५ किमीमध्ये २३२ महिला व ३५२ पुरुष सहभागी होणार आहेत. तर ३ किमी स्पर्धेत १२२ महिला आणि १०५ पुरुष सहभागी होणार आहेत. लातूरमध्ये होणारी ही एकमेव हाफ मॅरेथॉन स्पर्धा आहे. या स्पर्धेत लातूर जिल्ह्यातील स्पर्धकांसोबत इतर जिल्ह्यातील स्पर्धकही उत्साहाने सहभाग नोंदवितात. या स्पर्धेचे मुख्य प्रायोजकत्व लातूर अर्बन को. ऑप. लिमिटेड बँकेने स्वीकारले आहे. लातूरकरांच्या उत्तम आरोग्यासाठी, शरीर सुदृढतेसाठी आयएमएच्या वतीने नियमित विविध आरोग्य विषयक उपक्रम राबविले जातात. इंडियन मेडिकल लातूर शाखेतर्फे या भव्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून ही स्पर्धा ३ किमी, ५ किमी, १० किमी व २१ किमी अंतरासाठी होणार आहे. २१ किमी. स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक १२ हजार रुपये, द्वितीय ८ हजार, तृतीय ६ हजार रुपये ठेवण्यात आले आहे. १० किमी. अंतरासाठी प्रथम पारितोषिक ७ हजार, द्वितीय ५ हजार तर तृतीय पारितोषिक ३ हजार रुपये आहे. डॉक्टर्स गटासाठी तसेच त्यांचे कुटुंबिय व सर्वसामान्य जनतेमध्ये धावणे हा व्यायाम प्रकार रुजावा व त्याचे आरोग्यविषयक फायदे सर्वांना कळावे यासाठी ही मॅरेथॉन स्पर्धा अनेकांना प्रोत्साहित करणारी ठरली आहे. या स्पर्धेत सहभागी झालेल्या विजेत्या स्पर्धकांना सुंदर असे मेडल्स आणि सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्रे वितरित केली जाणार आहेत. स्पर्धकांना आंतरराष्ट्रीय मानकांनुसार टाईमिंग चिप, टी शर्ट, स्पर्धेनंतर अल्पोपहाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. स्पर्धेआधी मॅरेथॉन स्पर्धेची तयारी करून घेण्यासाठी अनेक तज्ज्ञ डॉक्टर्स नोंदणी केलेल्या स्पर्धकांना वेळोवेळी मार्गदर्शन करत आहे. त्यासोबतच स्पर्धेची पूर्व तयारी म्हणून झुंबा नृत्य प्रकाराचा सराव आदर्श व संतुलित आहार कसा ठेवावा, धावण्यासाठी सकारात्मक मानसिकता कशी ठेवावी याबद्दल देखील वेळोवेळी मार्गदर्शन होत आहे. ही स्पर्धा दि. ३ मार्च रोजी सकाळी ५.३० मान्यवरांच्या हस्ते बिडवे लॉन्स याठिकाणी हिरवी झेंडी दाखवून सुरु होणार असून स्पर्धेचा समारोप सकाळी ९ वाजता बक्षिस वितरण सोहळ्याने होणार आहे. लातूर अर्बन को. ऑप. लिमिटेड बँक मुख्य प्रायोजक असणाऱ्या या स्पर्धेचे सहप्रायोजक क्वालिटेक एलेव्हेटर्स, भारती अँड गित्ते ग्रुप, किर्तीगोल्ड उद्योग, सनरीच ऍक्वा, कौशल्य अकॅडेमी, स्पर्धेचे फूड पार्टनर हॉटेल कार्निवल व स्थळ प्रायोजक बिडवे लॉन्स असून स्पर्धेची सुरुवात व समारोप स्थळ बिडवे लॉन्स, औसा रोड येथे असणार आहे. बिडवे लॉन्स औसा रोड ते पीव्हीआर चौक ते नवीन रेणापूर नाका या मार्गावर होत असलेल्या मॅरेथॉन स्पर्धेसाठी वाहतूक नियंत्रण शाखा, लातूर पोलीस व महानगरपालिकेची यंत्रणा सज्ज असून पोलीस निरीक्षक गणेश कदम हे समन्वय साधत असून धावपटूंना कुठलीही अडचण येणार नाही याची काळजी घेत आहेत. आयएमएथॉन २०२४ लातूर स्पर्धेसाठी आयोजकांना जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर–घुगे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) भागवत फुंदे यांनी शुभेच्छा दिल्या असून त्यांची प्रमुख उपस्थिती देखील राहणार आहे. आयएमएथॉन २०२४ साठी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, माजी मंत्री आ. अमित विलासराव देशमुख, माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, आमदार धीरज विलासराव देशमुख, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेशआप्पा कराड, आ. विक्रम काळे यांनी देखील शुभेच्छा दिल्या असून स्पर्धेच्या उद्घाटनासाठी व बक्षीस वितरणासाठी ही मान्यवर मंडळी सुद्धा उपस्थित राहणार आहेत. तीन मार्च २०२४ रविवार रोजी लातूरचा रस्त्यावर उत्साह, ऊर्जा व स्पर्धा अनुभवण्यासाठी ख च्या स्पर्धकांना प्रोत्साहित करण्यासाठी नक्कीच सहभागी व्हा, फक्त धावण्यापुरतेच नाही तर इंडियन मेडिकल असोसिएशन लातूरच्या डॉक्टरांना पाठिंबा देण्यासाठी, आरोग्य विषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी व स्त्री शक्तीला सक्षम करण्यासाठी आयएमएथॉन २०२४ लातूरमध्ये जरूर सहभागी व्हावे व आपल्या आयुष्यात निरोगी राहण्यासाठी व्यायामाची सुरुवात आनंददायी पध्दतीने करा असे आवाहन आयएमए लातूरचे अध्यक्ष डॉ. अनिल राठी, सचिव डॉ. आशिष चेपुरे, वूमेन्स विंगच्या अध्यक्षा डॉ. प्रिती बादाडे, सचिव डॉ. प्रियंका राठोड, उपाध्यक्ष डॉ. अशोक पोद्दार, डॉ. अनुजा कुलकर्णी, डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. राजेश दरडे , डॉ. जितेन जयस्वाल , कोषाध्यक्ष डॉ. अर्जुन मंदाडे, प्रोजेक्ट चेअरमन डॉ. आरती झंवर, डॉ. चांद पटेल, डॉ. ब्रिजमोहन झंवर, क्रीडा समितीचे सदस्य डॉ. अजय जाधव, डॉ. शशिकांत कुकाले, डॉ .चेतन सारडा, डॉ. विक्रम सारडा, डॉ. शितल ठाकूर – टीके, डॉ. सतीश हंडरगुळे, डॉ. चंद्रशेखर अष्टेकर , डॉ. ज्योती सूळ, डॉ. केतकी चवंडा यांसह सर्व आयएमए पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# जीवन जगण्याची कला शिकवणारा ग्रंथ..

जीवन जगण्याची कला शिकवणारा ग्रंथ..
समीक्षा : श्रीमती.मनीषा जाधव अंतरकर.
भगवान बुद्ध–आनंदी जीवनाचा मार्गदाता
लेखक डॉ. के .पी .वासनिक,नवी दिल्ली
अनुवाद भीमराव सरवदे,औरंगाबाद.
प्रकाशक : आनंद प्रकाशन,औरंगाबाद.
किंमत: ३०० रूपये. पृष्ठे ३०४.

भगवान बुद्ध –आनंदी जीवनाचा मार्गदाता हे डॉ.के.पी. वासनिक यांचे पुस्तक वाचून अतिशय आनंद झाला.पुस्तक वाचून मन शांत झाले.आज आपण अनेकजण निराशाजनक दुखी अवस्थेत जीवन जगत असतो.या निराशाजनक जीवनातून, दुःखातून बाहेर काढण्यासाठी के.पी.वासनिक यांचे भगवान बुद्ध आनंदी जीवनाचा मार्गदाता हे पुस्तक अतिशय योग्य आहे.म्हणतात ना जगाला युद्ध नको बुद्ध हवा. अशाच बऱ्याचशा गोष्टी या पुस्तकातून लेखकांनी मांडलेले आहेत.अतिशय साध्या सरळ भाषेमध्ये पुस्तक असल्यामुळे वाचनाचा अजिबात कंटाळा येत नाही.मी माझा अनुभव सांगते मी हे पुस्तक दोन वेळा वाचले.प्रत्येक वेळा मला याच्यातून वेगळं ज्ञान प्राप्त झालं.हे पुस्तक केवळ वाचून बाजूला ठेवण्याचा विषय नाही.असे माझ्या लक्षात आले.मी शाळेमध्येही पुस्तक माझ्यासोबत ठेवते. जेव्हा मनामध्ये निराशा दुःख निर्माण होतं. तेव्हा तेव्हा या पुस्तकातून मला प्रेरणा मिळते आनंद मिळतो. हे पुस्तक म्हणजे जगण्याची कला शिकवणारा ग्रंथ आहे. लहानापासून तो मोठ्यांपर्यंत प्रत्येकजण वाचनाचा आस्वाद घेतल्यास प्रत्येकाच्या जीवनामध्ये बदल नक्कीच होईल.असेच विचार लेखकांनी अनेक उदाहरणं देऊन आपल्याला पटवून दिलेले आहेत. पुस्तकामध्ये एकूण १३ प्रकरण आहेत.भगवान गौतम बुद्ध,भगवान बुद्धांचा पहिला धम्मोपदेश,चार आर्यसत्य,पंचशील,आर्य अष्टांगिक मार्ग,दहा पारमिता,मध्यम मार्ग,कारण आणि परिणाम,अनित्य,शून्यता,विपश्यना,प्रतित्य समुपाद,निब्बान प्रत्येक प्रकरण म्हणजे जीवनात खूप मोठी शिकवण आपल्याला देऊन जाते. लेखकांचा हा ग्रंथ वाचून मला खऱ्या अर्थाने गौतम बुद्ध समजले.भगवान बुद्धांचा जन्म,बालपण, ग्रहत्याग याच्या विषयी सविस्तर मांडणी करण्यात आलेली आहे. भगवान बुद्ध सत्याच्या शोधात निघाले त्यांनी ज्ञान प्राप्त केले. मानवाला दुःखातून मुक्त करण्यासाठी भगवान बुद्धांनी सर्व कार्य केलेले आहे. लेखक मांडणी करतात की भगवान बुद्धाला शिक्षक म्हणून आपल्या जबाबदारीची जाणीव झाली आणि शिक्षक या भूमिकेतून त्यांनी अनेक ठिकाणी प्रवचने केली.ज्ञानप्राप्तीनंतर कपिल वस्तूंची पहिली भेट या प्रकरणातून मला खरंच खूप चांगल्या गोष्टी समजल्या.भगवान बुद्धांनी जरी ग्रहत्याग केला होता . तरी त्यांचे वडील आजारी असताना त्यांनी आपल्या वडिलांची काळजी घेतली. तथागत भगवान बुद्धांचे आपल्या पित्याला संबोधन अतिशय मनाला स्पर्श करून जाते. भगवान बुद्धांची आई पत्नी आणि मुलाबरोबर ची शेवटची भेट.भगवान बुद्धांचे महापरिनिर्वाण या गोष्टीतून असे लक्षात येते की माणसाने कोणत्याच गोष्टींचा मोह करता कामा नये.महापरिनिर्वानाच्या आधी भगवान बुद्ध प्रवचन करतात त्यात ते सांगतात,मी तुम्हाला सल्ला देतो की नाश पावणे स्वाभाविक आहे.मेहनतीने स्वतःच्या मुक्तीसाठी प्रयत्न करा . कोणत्याही धार्मिक गुरूंचे नेत्याचे अनुसरण करू नका. त्यांच्या शिकवणुकीचे अनुसरण करा.मृत्यूकडे पाहायला लावणारा एवढा सकारात्मक दृष्टिकोन भगवान बुद्ध आपल्याला देतात. बुद्धांची शिकवण प्रत्येक माणसाला स्वतःकडे खेचून घेऊ शकते. जातीव्यवस्थेची अन्यायकारक व्यवस्था बुद्धांना मान्य नव्हती. लेखक म्हणतात की ज्ञानसाधना आणि ज्ञानप्राप्तीच्या दृष्टीने इतर कोणत्याही धार्मिक गुरुशी त्यांची तुलना होऊ शकत नाही याचा अनुभव हे पुस्तक वाचल्यावर मला आला.बुद्धांचे तत्त्वज्ञान अगदी साधे सरळ आहे ते अंधश्रद्धेला नकार देतात.भगवान बुद्ध स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवण्यास भाग पाडतात.भगवान बुद्धांनी देवाच्या अस्तित्वावर कोणतीही टीका टिप्पणी केली नाही कारण ह्या गोष्टी माणसाला सुखी आणि आनंदी जीवन जगण्यासाठी आवश्यक नाहीत.भगवान बुद्ध लोकांना दुःख आणि दुःखापासून मुक्ती मिळवण्यासाठी परिश्रम घेण्याचा सल्ला देतात.जीवनात खरे ज्ञान मिळवणे आणि त्या ज्ञानाचा उपयोग करून घेणे इतरांसाठी व स्वतःसाठी लेखकाने सुटसुटीत पद्धतीने भगवान बुद्धांच्या विचाराची मांडणी केलेली आहे .भगवान बुद्धांनी स्वतःला कधीच तारणहार म्हणून घोषित केले नाही.भगवान बुद्ध इतरांच्या श्रद्धा आणि धर्माचा आदर करण्यास सांगतात.भगवान बुद्धांचे जीवन म्हणजे प्रेम मैत्री आणि करुणा.भगवान बुद्धांचा शेवटचा संदेश मध्ये ते सांगतात. माझी शिकवण ही काही शिकवण किंवा तत्त्वज्ञान नाही ती माझ्या प्रत्यक्ष अनुभवाचा परिणाम आहे. मानव कल्याण हे त्यांच्या धम्माचं मुख्य उद्दिष्ट आहे. भगवान बुद्धांचा पहिला धम्मोपदेश या प्रकरणातून प्रत्येक व्यक्तीने तीन मार्गाचे अनुसरण करावे.पावित्र्याचा मार्ग सदा चरणाचा मार्ग आणि शील मार्ग.चार आर्य सत्य अष्टांगिक मार्ग दहा पारमिता आचरण कसे करावे.भगवान बुद्ध म्हणजे समाजाला योग्य दिशा देणारे एक समाज सुधारक अशी मांडणी लेखक करतात.

प्रकरण तिसरे चार आर्य सत्य.माणूस जन्माला येतो तेव्हापासून त्याच्या दुःखाला सुरुवात होते.दुःख,दुःख समुदाय,दुःख निरोध,दुःख निरोध मार्ग या चार आर्य सत्याची ओळख लेखक आपल्याला करून देतात. दुःख तीन प्रकारचे असते. शारीरिक मानसिक, आध्यात्मिक याची मांडणी लेखक करतात.भगवान बुद्ध दुःखाची आठ कारणे सांगतात.त्याची मांडणी या प्रकरणात आलेली आहे.भगवान बुद्धांनी सांगितलेली चार आर्यसत्य माणसाच्या जीवनातील दुःख दूर करतात.मानवी दुःखाचा शोध घेण्याचे कार्य बुद्ध या ठिकाणी करतात. दुःखाची कारणे सांगतात.जन्म, वृद्धाप काळ,आजारपण,मृत्यू,आप्तेष्टांचा विरोह,अप्रिय वस्तूंचा सामना करावा लागणे, इष्ट वस्तू न मिळणे आणि भ्रमामुळे दुःख होणे. शेवटी दुःखाच्या समाप्तीकडे नेणारा मार्ग या ठिकाणी दाखवलेला आहे. दुःखाचा नाश करणारा आष्टांगिक मार्ग म्हणजे सम्यक दृष्टी,सम्यक संकल्प,समयक वाणी,सम्यक कर्मात,सम्यक अजीविका,सम्यक व्यायाम,सम्यक समाधी,समयक व्यायाम,सम्यक स्मृती या अष्टांगिक मार्गाचा जीवनात उपयोग केल्यास दुःखापासून मुक्ती होते. प्रकरण चौथे पंचशील या प्रकरणांमध्ये लेखक पंचशील तत्त्वाची ओळख करून देतात. हिंसा न करणे,चोरी न करणे,वैभिचार न करणे,असत्य न बोलणे,मद्यपान न करणे या पंचशील तत्त्वांची ओळख होते.पाचवे प्रकरण आर्य अष्टांगिक मार्गामध्ये अष्टांगिक मार्गाची ओळख करून देतात. तसेच प्रत्येक मार्गाचे स्पष्टीकरण केलेले आहे. बौद्ध धम्माचे तीन अवश्य घटक लेखकाने मांडले आहे. नैतिक आचरण,मानसिक शिस्त आणि बुद्धी.या पाठानंतर आलेल्या सारांश मधून आपल्याला खूप काही शिकता येते. धम्मपदामध्ये नीतिमान मनुष्याचे केलेले वर्णन अतिशय मन वेधून घेते.ज्याप्रमाणे महामार्गावरील कचऱ्याच्या ढिगाऱ्यात लीली हे पुष्प मधुर सुगंधाने आणि आनंदाने भरभरून उमलते अशाप्रकारे खऱ्या अर्थाने कचऱ्यासारखे असलेल्या लोकांमध्ये अंधारात भटकणाऱ्या लोकांमध्ये प्रबुद्ध बुद्धांचा शिष्य त्याच्या ज्ञानाने चमकतो. अतिशय मनाला वेधून घेणारी सुंदर शिकवण बुद्धांनी दिलेली आहे.आणि याची मांडणी अतिशय सुंदर पद्धतीने लेखकाने केली आहे.म्हणून पुस्तक वाचत असताना खूप छान वाटते. मनाला एक आनंद मिळतो.आपण विचाराने समृद्ध होत आहोत ही भावना हे पुस्तक वाचताना होते.

प्रकरण सहावे दहा पारमिता.या प्रकरणांमध्ये लेखक दान,शील नैतिकता,प्रज्ञा,विवेक,शहाणपण,त्याग,ऊर्जा संयम,सत्य,अधिष्ठान,मैत्रीभाव,उपेक्षा किंवा समभाव, दहा पारमिता व त्याचे स्पष्टीकरण लेखकाने या प्रकरणात केलेले आहे.प्रकरण सातवे मध्यम मार्ग.या प्रकरणात भगवान बुद्धांनी सांगितलेल्या जीवनाची दोन टोके आणि या दोन टोकांची ओळख लेखक आपल्याला करून देतात.टोकाची भूमिका घेण्यापेक्षा मध्यवर्ती भूमिका घेणे बुद्धांनी सांगितलेले आहे.मध्यम मार्ग पटवून देण्यासाठी लेखकाने या ठिकाणी वापरलेले उदाहरण अतिशय उद्बोधक आहे.जसे कमळाचे फुल चिखलात उगवते.चिखलातून अन्न आणि पाणी घेते. परंतु कमळाचे फुल चिखलाचा भाग बनत नाही.चिखलात राहूनही चिखलापासून वेगळे अस्तित्व टिकून ठेवते हाच मध्यम मार्ग आहे.या प्रकरणात लेखकाने मध्यम मार्गाचे व्यवहारिक उपयोगही सुचवलेले आहे. प्रत्येक प्रकरणा नंतर येणाऱ्या सारांश आपल्याला प्रकरणात आपण काय शिकलो याची जाणीव करून देतो.लेखकाने सारांशाची जी कल्पना मांडली ती अतिशय उद्बोधक आहे.

प्रकरण आठवे कारण आणि परिणाम.या प्रकरणातून लेखकाने वाईट कर्म आणि सत्कर्म हे आपल्यावर कसे परिणाम करतात.कर्माचे नियम दोन पातळ्यावर आहेत ते लेखक समजावून देतात.कारण आणि परिणाम या दोन गोष्टीही हेतू पुरस्कार आपल्यापुढे मांडतात. सत्कर्म चांगले परिणाम घडून आणतात आणि वाईट कर्म वाईट परिणाम घडून आणतात त्याची मांडणी लेखकाने केली आहे.प्रकरण नववे अनित्य..या प्रकरणांमध्ये लेखकाने अस्तित्वाची तीन मूलभूत तत्त्वे मांडले आहेत.अनित्यता किंवा सततचे बदल,स्व ची भावना किंवा तथ्यहिनता आणि दुःख किंवा असमाधानकारकता वेगवेगळी उदाहरण देऊन लेखक आपल्या अस्तित्वाच्या या तीन मूलभूत तत्वाची मांडणी करतात.भगवान बुद्ध तीन प्रकारच्या दुःखाबद्दल सांगतात.दुःखाचे दुःख,परिवर्तनाचे दुःख सर्वव्यापी दुःख..या तिन्ही गोष्टी लेखक अतिशय सुंदर पद्धतीने आपल्याला समजावून सांगतात. प्रकरण दहावे शून्यता..या प्रकरणातून लेखकाने शून्यता ही संकल्पना समजावून सांगितलेली आहे.तिचं महत्त्व पटवून दिलेल आहे.या प्रकरणांमध्ये आचार्य नागार्जुन यांचे विचार लेखकाने मांडलेले आहे.हे विचार माणसाचे मन वेधून घेतात.जेव्हा शून्यता शक्य असते
सर्व काही शक्य असते
जेव्हा शून्यता अशक्य असते
तेव्हा काहीही शक्य नसते

प्रकरण अकरावे विपश्यना..या प्रकरणातून लेखकाने विपशनेचे महत्त्व प्रत्येकाला सांगितले.मन आणि मेंदू आनंद आणि दुःखी मन मनाच्या एकाग्रतेच्या विविध पद्धती, विपश्यना का? विपश्यना ध्यान म्हणजे काय? विपश्यना ध्यानाच्या पद्धती..विपश्यना ध्यानाचे दोन प्रकार विश्लेषणात्मक आणि केंद्रित.ध्यान करण्याच्या पायऱ्या, विपश्यनेचा कालावधी,आनापान सती प्रक्रियेतील पायऱ्या, शरीरात संवेदना कशा उद्भवतात,शरीराच्या संवेदनाचे निरीक्षण कसे करावे,संवेदनांचे निरीक्षण महत्त्वाचे का आहे, संवेदनांची तात्पर्य, ध्यान सरावासाठी पाच अडथळे आहे. त्याची मांडणी लेखक करतात.कामुक इच्छा,तिरस्कृत भावना,आळस,सुस्ती आणि तंद्री अस्वस्थता आणि काळजी,शंका अनिश्चितता संशय या सर्व बाबींची सविस्तर मांडणी लेखक करतात. विपश्यना रोज का करावी याची मांडणी अतिशय सुंदर पद्धतीने लेखकाने केलेली आहे. विपश्यनेचा सराव कोण करू शकतो .विपशनेचे फायदे कोणते आहेत.भगवान बुद्ध नंतर विपश्यनेची सद्यस्थिती काय याची मांडणी लेखकाने केलेली आहे.शेवटी भगवान बुद्धांची तीन छोटी वाक्य मोलाची शिकवण देतात.याकडे आपले लक्ष खेचले जाते.असे काहीही करू नका जे नकारात्मक असेल.सर्व काही सद्गुण चांगले सकारात्मक करा.आणि तुमच्या मनावर नियंत्रण ठेवा.

प्रकरण बारावे प्रतीत्यसमुतपाद..या प्रकरणांमध्ये लेखक परावलंबी उत्पत्तीचे उदाहरणे देतात.बारा कड्यांची साखळी व भवचक्र याची माहिती या प्रकरणात करून दिलेली आहे. चित्राद्वारे त्या बारा कड्याची माहिती सांगितलेली आहे. प्रकरण तेरावे निब्बांण या प्रकरणांमध्ये निब्बान मोक्षापेक्षा वेगळा कसा आहे.प्रत्येक जण निब्बान साध्य करू शकतो का? निब्बानचा मार्ग गौतम बुद्धांनी सांगितलाय.शेवटी भगवान बुद्धांचा शेवटचा संदेश प्रत्येकाला खेचून घेईल भगवान बुद्ध म्हणाले की आरोग्य ही सर्वात मोठी देणगी आहे.समाधान ही सर्वात मोठी संपत्ती आहे.विश्वासू मित्र हा सर्वोत्तम नातेवाईक आहे.निब्बान हा सर्वात मोठा आनंद आहे.प्रत्येक प्रकरणातून अतिशय सुंदर पद्धतीने लेखकांनी विचार मांडलेले आहेत.वेगवेगळ्या पद्धतीने उदाहरण देऊन बुद्धांनी दिलेली शिकवण प्रत्येकाला पटवून देऊन,दुःखातून मुक्त होण्याचा मार्ग या पुस्तकात सांगितलेला आहे.प्रत्येक प्रकरणानंतर सारांश दिलेला आहे यामुळे प्रकरण वाचल्यावर आपण नेमके काय वाचले आणि काय लक्षात ठेवायला पाहिजे हे सुचविते.लेखकांनी सुखी तसेच आनंदी कसे रहावे, इतरांना सुख कसे द्यावे याचा अतिशय सुंदर पद्धतीने संदेश देवून खरंच पुस्तकाचे नाव सार्थकी लावले आहे.भगवान बुद्ध आनंदी जीवनाचा मार्गदाता लेखक डॉक्टर के.पी.वासनिक यांचे अतिशय वाचनीय आणि मार्गदर्शक असे पुस्तक आहे.प्रत्येकाने वाचावे आणि आनंदी जीवनाचा मार्ग अनुसरावा असेच हे पुस्तक आहे. सर्वसामान्यांनाही हे पुस्तक वाचून खूप प्रेरणा घेता येईल.लेखकांनी पंडित्यपूर्ण लिखाण टाळलेले आहे व वाचकांना समजेल अशा भाषेतच लिखाण केलेले आहे.अगदी लहान मुलंही या पुस्तकातून प्रेरणा घेऊ शकतात.हे पुस्तक वाचून असे म्हणावेसे वाटते की खरंच आज जगाला युद्धाची नाही बुद्धाची गरज आहे.

प्रसिद्ध लेखक आयू.भीमराव सरवदे औरंगाबाद यांनी अत्यंत सोप्या मराठी भाषेत भाषांतर केले आहे तसेच श्री. शरद हतोले आनंद प्रकाशन औरंगाबाद नी या पुस्तकाची मांडणी आणि बांधणी फार सुरेख केली आहे आणि कव्हर पेज फार बोलके आणि मार्मिक आहे.प्रत्येकाने वाचावे आणि आपले जीवन आनंदी आणि सुखा समाधानाने जगावे असेच हे पुस्तक आहे.मला डॉ.के.पी.वासनिक यांचे पुस्तक वाचायला मिळाले याचा मला मनस्वी आनंद आहे.आणि निश्चितच या पुस्तकांनी माझ्या जीवनामध्ये खूप बदल केलेले आहेत आणि हे पुस्तक वाचून माझ्या जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलली आहे. खरंच मी जिथे जाते तिथे हे पुस्तक माझ्या सोबत बाळगते. मला मनापासून जे वाटले तेच मी या ठिकाणी मांडलेले आहे. प्रत्येक वाचकाने याचा अनुभव घ्यावा. वाचकानी स्वतः अनुभव घ्यावा अशी वाचकांना विनंती. अत्यंत चांगली पुस्तक लिहून लेखकाने याद्वारे आपल्याला प्रबुद्ध करण्याचा प्रयत्न स्तुत्य आहे याबद्दल

**लेखक डॉ.के पी वासनिक,**
**नवी दिल्ली (९८९१९०१३१६) यांचे मनपूर्वक हार्दिक अभिनंदन आणि धन्यवाद.**

# किनवट तालुक्यात वाढले महामार्गावरील अपघाताचे प्रमाण यात दारू पिऊन हलगर्जीपणे वाहन चालवणारा ची संख्या लक्षणीय



किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) माहूर नांदेड १६१महामारग वर अपघातांचे प्रमाण वाढले असून यासाठी दारू पिऊन वाहन चालवणे, वाहन चालवताना निष्काळजीपणा, वाहतूक नियमाकडे दुर्लक्ष यासह वळणदार रस्ता घातक ठरत आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक असून रस्ता गुळगुळीत व रुंदीकरण झाला असला तरी वाढत्या अपघाताची मालिका चिंता वाढविणारी आहे. या महामार्गावर मार्गदर्शक फलक व वळणावर दिशानिर्देशक बरेच ठिकाणी दिले नसल्याने हेही कारण अपघातास कारणीभूत ठरत आहे. माहूर नांदेड महामार्गावर सारखानी फाटा ते किनवट शहरापर्यंत अनेक ठिकाणी वळणे आहेत. या वळणावर भरधाव जात असताना वाहन चालकांना कुठलाही अंदाज येत नाही. त्यात दारू पिऊन वाहन चालवणे, वाहन चालवताना निष्काळजीपणा, वाहतूक नियमाकडे दुर्लक्ष, वाहनाची वेळेवर देखभाल न करणे लहान मुलांना दुचाकी वाहन चालवण्यात देणे यासह अनेक अपघातामध्ये कारणाचा समावेश करता येईल. या महामार्गावर लोणी फाट्याजवळ, घोटी परिसरात धोकादायक आणि अपघातग्रस्त ठिकाणे आहे. गेल्या महिनाभरात येथे अनेक अपघात झाले. त्यात ओव्हरटेक करण्याच्या नादात समोरासमोर धडक होण्याचे प्रकार खूप आहे. रस्त्याची रुंदी वाढविण्यात येऊन रस्ता गुळगुळीत असल्यामुळे या महामार्गावर वाहनांची वर्दळ व वेग वाढला आहे. किनवट तालुक्यात भाजीपालासह ग्रामीण भागातून विविध भाजीपाला याची किनवटकडे वाहतूक करणाऱ्या वाहनांची या मार्गावर संख्या वाढली आहे. महामार्गालगत सहज मि ळणारी दारू होणाऱ्या अपघाताला विशेष कारणीभूत ठरत आहे. रस्ता चांगला झाल्याने वाहनांचा वेग वाढलेला आहे. याठिकाणी दिशादर्शक आणि मार्गदर्शन सूचना फलकांचा अभाव आहे. संबंधित विभागाने रस्त्यावर फलक लावण्याची गरज असून या सोबतच ड्रिंक अँड ड्राइव्ह वर कठोर निर्बंध आणून यासह वाहतूक नियमाविषयी वाहन चालकां मध्ये व्यापक जनजागृती करण्याची गरज आहे.

# माधवराव पाटील महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा



मुरुम (प्रतिनिधी) : – येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या मराठी पदवी–पदव्युत्तर विभागाच्या वतीने कविवर्य कुसुमाग्रज जन्मदिवसाच्या निमित्ताने मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन करण्यात आले होते. कविवर्य वि. वा. शिरवाडकर यांचा मंगळवारी (ता. २७) रोजी हा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यावेळी उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, डॉ. नागनाथ बनसोडे, प्रा. सोमनाथ व्यवहारे, डॉ. दिनकर बिराजदार, डॉ. महेश मोटे, डॉ. मुकुंद धुळेकर, डॉ. राजू शेख, डॉ. रमेश आडे, डॉ. अरविंद बिराजदार, डॉ. भिलसिंग जाधव, प्रा. अशोक बावगे, डॉ. नरसिंग कदम, डॉ. महादेव कलशेट्टी, डॉ. अप्पासाहेब सूर्यवंशी, डॉ. अरुण बावा, डॉ. नागोराव बोईनवाड, प्रा. गोपाळ कुलकर्णी, डॉ. रवींद्र आळंगे, डॉ रवींद्र गायकवाड, डॉ. राजेंद्र गणापूरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी कवीवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील माधवराव पाटील महाविद्यालयात मराठी राजभाषा गौरव दिन साजरा करताना चंद्रकांत बिराजदार, नागनाथ बनसोडे, सोमनाथ व्यवहारे, दिनकर बिराजदार व अन्य.

# सायबर सेक्युरीटी विषयावर उद्या लातुरात व्याख्यानाचे आयोजन : ॲड. जयश्रीताई पाटील



लातूर : महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वूमेन लॉयर्स संघटनेच्या स्टडी सर्कलचे ( कायदेविषयक माहिती ) उद्घाटन गुरुवार, दि. २९ फेब्रुवारी २०२४ रोजी दयानंद सभागृहात सकाळी साडेदहा वाजता होणार असून यानिमित्त नाशिकचे सायबर लॉ तज्ज्ञ प्रा. विकास नाईकसर यांच्या ' सायबर सेक्युरीटी' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वूमेन लॉयर्स संघटनेच्या अध्यक्षा एड. जयश्रीताई पाटील यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

हा कार्यक्रम महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वूमेन लॉयर्स , दयानंद विधी महाविद्यालय आणि लातूर जिल्हा वकील मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आल्याचे सांगून एड. जयश्रीताई पाटील पुढे म्हणाल्या की, स्टडी सर्कलचा हा उद्घाटन सोहळा लातूरचे खासदार सुधाकर शृंगारे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य एड. अण्णाराव पाटील हे राहणार आहेत. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य एड. मिलिंद पाटील, ऑल इंडिया फेडरेशन ऑफ वुमेन लॉयर्सच्या उपाध्यक्षा एड. जयश्री अकोलकर, फेडरेशनच्या माजी अध्यक्षा एड. निलिमा वर्तक, व्याख्याते प्रा. विकास नाईकसर, एड. बळवंत जाधव यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे. प्रा. विकास नाईकसर हे नाशिकचे ख्यातनाम सायबर तज्ज्ञ असून या क्षेत्रात त्यांचा २० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांनी अनेक सायबर गुन्हेगारांचा यशस्वी माग काढण्यात मौलिक भूमिका बजावण्याचे काम केले आहे. आजमितीस समाजात वावरणारी प्रत्येक व्यक्ती मोबाईल फोन, लॅपटॉप यासारखी इंटरनेटचा उपयोग केला जाणारी साधने वापरतात. सायबरशी संबंधित गुन्ह्यांचे प्रमाण सध्या मोठ्या प्रमाणात वाढल्याचे पाहायला मिळते. त्यासाठी इंटरनेटचा वापर करताना कोणती दक्षता बाळगणे गरजेचे आहे, याविषयी जनजागृती होणे अत्यंत आवश्यक आहे. कोणत्या लिंकचा वापर करावा, कोणत्या लिंकचा वापर करूच नये यासारखे ज्ञान प्रत्येकास मिळणे गरजेचे झाले आहे. त्याच उद्देशाने सदर अभ्यासपूर्ण व्याख्यानाचे आयोजन करण्यात आल्याचे जयश्रीताई पाटील यांनी सांगितले.

लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष एड. महेश बामणकर यांनी याप्रसंगी आपले विचार व्यक्त करताना सायबर सेक्युरीटी हा विषय सध्यस्थितीत अत्यंत महत्वाचा आहे. त्यामुळे या व्याख्यानाचा लाभ लातूर शहरातील सर्वच क्षेत्रातील नागरिकांनी अवश्य घ्यावा असे आवाहन केले. या पत्रकार परिषदेस एड. किरण चिंते, एड. सुरेखा जाकते , एड. अरुणा वाघमारे, एड. पूनम सुरकुटे , एड. पल्लवी कुलकर्णी, एड. सुनंदा इंगळे, एड. बबिता संकाये, एड. तृप्ती इटकरी आदींची उपस्थिती होती. स्टडी सर्कलच्या उद्घाटन सोहळ्यास व व्याख्यानास सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वूमेन लॉयर्स संघटनेच्या अध्यक्षा एड. जयश्रीताई पाटील , लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष एड. महेश बामणकर, साची एड. प्रदीपसिंह गंगणे, दयानंद विधी महाविद्यालयाचे प्राचार्य पूनम नाथानी यांनी केले आहे.

# महात्मा बसवेश्वरमध्ये 'मराठी भाषा गौरव दिन' उत्साहात संपन्न



लातूर :– महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात मराठी भाषा वाङमय विभागाच्यावतीने ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कविश्रेष्ठ वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा जन्म दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई होते तर उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, प्रा. व्यंकट दुडिले, प्रा. मारुती माळी, प्रा. शिवगीता तुपकरी, रत्नेश्र्वर स्वामी आणि नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात कविश्रेष्ठ वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमापूजनाने झाली. उपस्थित सर्व मान्यवरांच्या शुभ हस्ते महाराष्ट्राची लोकधारा, लोकसंस्कृती दर्शविणाऱ्या 'अस्मिता' या भित्तीपत्रिकेचे विमोचन करण्यात आले. यावेळी प्रास्ताविक करताना उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे म्हणाले की, कुसुमाग्रज हे मराठी साहित्यात चौफेर लेखन करणारे ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिक होते. त्यांचे एकूण साहित्य मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारे आहे. त्यांनी मराठी साहित्याचा गोडवा सर्वसामान्यांपर्यंत नेला अशा महान साहित्यिकाच्या साहित्याचे आपण सतत वाचन करायला हवे असेही ते म्हणाले. यावेळी कु. शिवाली मुकडे यांनी 'माणूस हरवलाय' स्वकविता सादर केली. यावेळी प्रा. व्यंकट दुडिले म्हणाले की, भाषा ही मानवास लाभलेली सर्वांत मोठी देणगी आहे. भाषेशिवाय माणसाची प्रगती खुंटते. आपल्याला प्रगती करायची असेल, व्यक्तिमत्त्वाचा विकास करायचा असेल तर आपली मातृभाषा जपली व जोपासली पाहिजे असे सांगून कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांची 'कणा' ही कविता सादर केली. प्रा. मारुती माळी म्हणाले की, मराठी भाषा ही संस्कृतीचे वाहन आणि संवर्धन करणारी भाषा आहे. संस्कृती आणि संस्कार यांचा अजोड संगम साधणारी आणि मानवी जीवनाला संस्कारित करणारी भाषा आहे असे ते म्हणाले. अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, मराठी भाषेचे संवर्धन करणे, जतन करणे, दर्जा जोपासणे आणि सन्मान करणे हाच खरा मराठी भाषेचा गौरव आहे. कुसुमाग्रजांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषेचा गौरव होणे म्हणजे कुसुमाग्रजांच्या साहित्यिक श्रेष्ठत्वाची पावतीच आहे. आज साहित्य क्षेत्र ते कला क्षेत्रापर्यंत मराठी भाषा सर्वांना आपलीशी झाली आहे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शंकर भोसले यांनी केले तर आभार प्रा. शिवगीता तुपकरी यांनी मानले. या कार्यक्रमास संदीप मोरे, संतोष येंचेवाड, भीमाशंकर सुगरे आदींचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी – विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत निरंकारी मंडळाचे उपक्रम हे मानव जातीसाठी वरदान आहे.–आमदार मोहनरावजी हंबर्डे





नांदेड:–संत निरंकारी मंडळ राबवीत असलेले प्रत्येक उपक्रम हे मानव जातीसाठी वरदान असतात असे वक्तव्य आमदार मोहनरावजी हंबर्डे यांनी स्वच्छता अभियानाच्या भेटी दरम्यान मत व्यक्त केले. भारताच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवा निमित्त अमृत प्रोजेक्ट अंतर्गत संत निरंकारी मंडळ स्वच्छ जल, स्वच्छ मन हा उपक्रम राबवीत असून या उपक्रमांतर्गत पाण्याच्या नैसर्गिक स्त्रोताचे व साठ्याचे स्वच्छता व संवर्धन करण्याचा उपक्रम राबवत आहे. या उपक्रमांतर्गत नांदेड येथील काळेश्वर मंदिर परिसरातील गोदावरी नदीकाठाची स्वच्छता करण्याचा उपक्रम राबविण्यात येत असलेल्या प्रसंगी आपल्या सदिच्छा भेटी दरम्यान आमदार मोहनराव हंबर्डे यांनी आपले मत व्यक्त करताना म्हणाले की संत निरंकारी मिशनचा प्रत्येक उपक्रम मानव जातीसाठी वरदान आहे. संत निरंकारी मंडळाच्या दानत्वाची प्रशंसा केली तेवढी कमीच आहे.या उपक्रमाप्रसंगी संत निरंकारी मंडळाच्या कार्याविषयी विस्तृत माहिती देताना नांदेडच्या संयोजक लता प्रेमचंदानीजी म्हणाल्या की सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज यांच्या आदेशानुसार संत निरंकारी मंडळ संपूर्ण विश्वामध्ये आजच्या दिवशी एकाच वेळेत १००० ठिकाणी व महाराष्ट्रात ९४ ठिकाणी स्वच्छ जल, स्वच्छ मन हा उपक्रम राबवित आहे. आज पाणी हेच जीवन असून सर्वांनाच पिण्यासाठी स्वच्छ पाणी पाहिजे असते परंतु पिण्याच्या पाण्याचा जलस्त्रोतांचे संवर्धन तथा स्वच्छता ठेवण्या करिता कुणीही प्रयत्न करत नाहीत. आज आम्ही वेळेत सावरून नैसर्गिक जलस्त्रोतांचे संवर्धन व स्वच्छ ठेवण्याचे कार्य केले नाही तर आम्हाला भविष्यात फार मोठ्या जल संकटाला तोंड द्यावे लागेल त्यामुळे प्रत्येक मानवाचे कर्तव्य आहे की त्यांनी आपल्या गावातील तसेच आजूबाजूच्या परिसरातील नदी,नाले,विहीर या सारख्या जलस्रोतांची स्वच्छता ठेवून संवर्धन करावे.याप्रसंगी आवर्जून उपस्थित असलेले वृक्षमित्र फाउंडेशनचे संतोष मुगटकर हे संत निरंकारी मंडळ राबवत असलेल्या उपक्रमाची प्रशंशा करताना म्हणाले की ही संस्था राबवित असलेले वननेस वन अंतर्गत वृक्ष लागवड, नदीकाठाची स्वच्छता तसेच रक्तदान यासारखे उपक्रम राबवून मानवतेसाठी वरदान ठरत आहेत.हा उपक्रम यशस्वीपणे राबविल्याबद्दल काळेश्वर मंदिराचे विश्वस्त यांनी संत निरंकारी मंडळाच्या मुखी लता प्रेमचंदानी आणि संचालक इंजि. दिलीप बाळसकर यांचा सत्कार केला तसेच संत निरंकारी मंडळाकडून सदिच्छा भेट दिल्याबद्दल आमदार मोहन हंबर्डे, बालाजीराव हंबर्डे, उत्तमराव हंबर्डे, जयसिंगराव हंबर्डे यांना मंडळाचे साहित्य देऊन गौरव करण्यात आला याप्रसंगी काळेश्वर मंदिर व्यवस्थापन समिती व वृक्ष मित्र फाउंडेशनचे संतोष मुगटकर व त्यांचे सहकारी उपस्थित होते. हा उपक्रम यशस्वी करण्याकरता जुगलकिशोर खियानी, मनिष हिराणी,सोनू फेरवाणी,आर जी.पवार यांचे योगदान व हदगाव, माहूर, किनवट, लोहा व नांदेड मधील अनेक तालुक्यातील संत निरंकारी मंडळाचे अनुयायी व सेवादल हजर होते तसेच या उपक्रमातून तीस ट्रॅक्टर कचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली व गोदाकाठ स्वच्छ करण्यात आला.

# उत्कृष्ट उद्योजकता पुरस्कारासाठी १५ मार्च २०२४ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

लातूर, दि. २१ (जिमाका): जिल्ह्यातील सुक्ष्म व लघु उद्योग घटकांसाठीच्या उत्कृष्ट उद्योजकता पुरस्कार सन २०२३ करिता उद्योजकांकडून १५ मार्च २०२४ पर्यंत अर्ज मागविण्यात येत असल्याचे जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रवीण खडके यांनी कळवले आहे. उद्योग संचालनालयाच्यावतीने सन १९८४ पासून लघु उद्योगांना प्रोत्साहन मिळावे म्हणून दरवर्षी जिल्हा स्तरावर दोन उत्कृष्ट सुक्ष्म व लघु उद्योगांना पुरस्कार दिले जातात. सन २००६ पासून प्रथम व द्वितीय पुरस्कार अनुक्रमे १५ हजार व १० हजार रुपये रोख, गौरवचिन्ह, शाल व श्रीफळ देवून गौरविण्यात येते. जिल्हा पुरस्कार योजनेअंतर्गत अर्ज करण्यासाठी अर्जाच्या वेळी, उद्योग घटक मागील तीन वर्षापूर्वी उद्यम नोंदणी असणे आवश्यक आहे. तसेच कमीतकमी मागील सलग दोन वर्षापासून उत्पादन सुरु असावे. उद्योग घटकाने बँकेचे कर्ज घेतले असल्यास त्या कर्जाची नियमितपणे परतफेड केलेली असावी. थकबाकीदार असू नये. उद्योग घटकांना यापूर्वी कोणताही जिल्हा, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार मिळालेला नसावा. महिला व मागासवर्गीय उद्योजकांना प्राधान्य देण्यात येईल. जिल्हा उद्योग केंद्राने विहीत केलेल्या नमुन्यात अर्ज करणे अनिवार्य आहे. लातूर जिल्ह्यातील लघु उद्योजकांनी १५ मार्च २०२४ पूर्वी लातूर जिल्हा उद्योग केंद्राकडे विहीत नमुन्यात अर्ज करावेत अथवा अधिक माहितीसाठी जिल्हा उद्योग केंद्राकडे संपर्क साधावा, असे आवाहन श्री. खडके यांनी केले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE